**नि.क्र. ४७**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ चा जबाब</u>**

साक्षीदाराचे नावः– **शिवम्मा शेषराव भंडे**

वयः– **५५** वर्षे, व्यवसायः– **शेती,**

राहणारः– **शिरशी हंगरगा ता. निलंगा जि. लातूर.**

**<u>सरतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ व्ही. एन. मेहेत्रे चे मार्फत शपथेवर सुरुः–</u>**

**०१.** घटना सात वर्षापुर्वी सकाळी ०८.०० वाजता आमच्या शेतामध्ये घटना घडली होती. आमच्या शेतात हरभरा पेरला होता. आरोपी क्र.१ बैल घेवून शेतातून जात होता. सत्यभामा त्यांना हरभरा पेरला आहे, कडेने बांधाने जा असे म्हणाली. आरोपी क्र.१ ने, “तु कोण छिनाल रांड, आम्हाला येथूनच जायचे आहे” असे तिला म्हणाला. त्यानंतर आरोपी क्र.१ ते ४ यांनी सत्यभामा आणि रेखाला लाथा–बुक्यांनी मारहाण केली. मी आणि माझे पती शेषराव भंडे यांनी ते भांडण सोडवले. आरोपी क्र.१ ते ४ यांना मी ओळखते. आरोपींपैकी आरोपी क्र.३ न्यायालयात हजर नाही. उर्वरीत आरोपी क्र.१, २ व ४ हजर आहेत. मी त्यांना ओळखते.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ के. एन. पवार मार्फत शपथेवर सुरुः–</u>**

०२. घटनेच्या वेळी मला चांगले ऐकू येत होते आणि दिसतही होते. भांडणाच्या वेळी मी घटना ठिकाणी होते. घटना ठिकाणी माझे शेत आहे. ती जमीन माझ्या सासऱ्यांची आहे. माझे सासरे आणि आरोपी क्र.१ मध्ये भांडण नव्हते. आरोपी क्र.१ हा माझ्या पतीला जमीण परत मागत होता. आरोपी क्र.१ दक्षीनेकडून उत्तरेकडे बैल घेवून त्याच्या शेताकडे जात होता. आरोपी क्र.१ बैल घेवून जातेवेळी एकटा होता. त्यानंतर आरोपी क्र.२ ते ४ आले. भांडनाचा आवाज ऐकून आरोपी क्र.२ ते ४ घटना

ठिकाणी आले. सत्यभामा माझी जाउ आहे. हे म्हणणे खरे नाही की, सत्यभामाच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. सत्यभामाला भांडणाच्या दिवशी दवाखाण्यात नेले होते. मला आमच्या शेताचा सर्वे नंबर सांगता येत नाही. माधवचे शेत आमच्या शेता पासून दक्षिण बाजूला आहे. आमच्या शेताच्या पुर्वेला आरोपी क्र.१ चे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने जमीन घेवू नये म्हणूण मी खोटी साक्ष देत आहे. त्या शेतामध्ये घटनेच्या पुर्वी दोन ते चार दिवस हरभरा पेरला होता. तो उगवला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.07.23 10:53:10 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांकः–२२/०७/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा.

ठिकाणः–निलंगा जिल्हा लातूर.